शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २१ । अंक २४८ । बुधवार, दि.२ सप्टेंबर २०२६ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## शासकीय बैठकीत आरोग्यदायी आहार बंधनकारक

**मुंबई ।** शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम आणि उपहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार, जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार आता संबंधित कार्यालयांच्या नवीन खानपान करारामध्ये आरोग्यदायी मेनूचा समावेश करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषक आहाराची सवय ही शासकीय कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनाचा भाग व्हावी.

## एका क्लिकवर मिळणार जमिनीचा सर्च रिपोर्ट

**मुंबई ।** महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी येथे व्यक्त केला. महसूल आणि वन विभागाकडून विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीची महाभूमी स्टॅक प्रणालीचा आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याविषयी सादरीकरण केले.

## संपादकीय

### हिमालयाचा इशारा समजून घ्यावा!


नेपाळच्या रसुवा परिसरातील भोटेकोशी किंवा लेंडे नदीच्या खोर्‍यात अलीकडेच झालेल्या भीषण जलप्रलयाने संपूर्ण भारतीय उपखंडाला हादरवून सोडले आहे. या निसर्गाच्या अमानुष तांडवात मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली असून शेकडो पर्यटक, कामगार व स्थानिक नागरिक बेपत्ता झाल्याने मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या किंवा बेपत्ता झालेल्या नागरिकांमध्ये भारतीय पर्यटकांची संख्या मोठी असल्याने भारताची चिंता अधिक तीव्र झाली आहे. ही केवळ एक स्थानिक किंवा तात्कालिक स्वरूपाची नैसर्गिक आपत्ती नसून, मानवाच्या अदूरदर्शी आणि अनिर्बंध विकासकामांना हिमालयाने दिलेला एक अत्यंत कठोर व गंभीर इशारा आहे. जेव्हा आपण निसर्गाच्या शाश्वत नियमांकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष करून विकासाचा अतिरेक करतो, तेव्हा हिमालयासारखे तरुण आणि भूगर्भीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील पर्वत आपली प्रलयकारी ताकद दाखवून देतात, ज्याचा प्रत्यय या घटनेतून आला आहे. हिमालयाची संपूर्ण भौगोलिक रचना ही अत्यंत तरुण, अस्थिर आणि भूकंपाच्या दृष्टीने कायम अतिसंवेदनशील राहिली आहे. भारतीय आणि युरेशियन टेक्टोनिक प्लेट्सच्या सततच्या आणि प्रचंड संघर्षातून या भव्य पर्वतराजीची निर्मिती झाली असून, आजदेखील ही प्लेट दरवर्षी काही मिलिमीटरने उत्तरेकडे

पान २ वर »

## रावेर तालुक्यात भूकंपाचा सौम्य धक्का

**रावेर ।** रावेर तालुक्यात मंगळवारी सकाळी ७ वाजून ५७ मिनिटांनी भूकंपाचा सौम्य धक्का नोंदविण्यात आला. भूकंपाची तीव्रता ३.३ रिश्टर स्केल इतकी असून, त्याचा केंद्रबिंदू मोहगण बु. गावाजवळ असल्याचे भूकंपाच्या नोंदीनुसार स्पष्ट झाले आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे ५ किलोमीटर खोलीवर होता.

भूकंपाची नोंद सकाळी ७ वाजून ५७ मिनिटे ३३ सेकंदांनी झाली. भूकंपाचे अक्षांश २१.३३२० उत्तर आणि रेखांश ७६.०७१० पूर्व असे नोंदविण्यात आले आहेत. भूकंपाचा केंद्रबिंदू रावेर तालुक्यात असल्याने परिसरात काही काळ चर्चेला उधाण आले होते. मात्र, भूकंपाची तीव्रता सौम्य असल्याने नागरिकांना हा धक्का जाणवला नाही.



**सातपुड्यातील मोहगण गावाजवळ केंद्रबिंदू**

भूकंपामुळे कोणत्याही प्रकारची जीवित अथवा वित्तहानी झालेली नसल्याची माहिती प्रशासनाकडून घेण्यात आली आहे. प्रशासनाने परिस्थितीची पाहणी करून संबंधित यंत्रणांकडून माहिती घेतली आहे.

या भूकंपाच्या घटनेला रावेरचे प्रभारी तहसीलदार संजय तायडे यांनी दुजोरा दिला आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि भूकंपासंदर्भातील अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत यंत्रणांकडून मिळणाऱ्या माहितीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मुख्य आरोपी ऋतुजा पाटील पोलिसांच्या ताब्यात

**एमपीएससी पेपर फूट प्रकरण**


**नंदुरबार ।** एमपीएससीच्या औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी ऋतुजा पाटील हिला नंदुरबारमधून ताब्यात घेण्यात आले. ऋतुजा हिला ताब्यात घेतल्यानंतर पेपरफुटी प्रकरणातील तपासाला वेग येणार आहे. ऋतुजा पाटील हिला नंदुरबारातील ज्ञानदीप सोसायटीमधील तिच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले आहे. मुंबई पोलिसांचे विशेष गुन्हे शाखेचे पथक आज सकाळपासून नंदुरबारमध्ये दाखल झाले होते. पोलिसांच्या पथकाने नंदुरबारातील विविध ठिकाणी झाडाझडती घेत चौकशी केली. त्यानंतर अखेर ऋतुजा पाटील हिला तिच्या निवासस्थानातून ताब्यात घेण्यात आले.आता ऋतुजाच्या ताब्यामुळे औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ऋतुजा पाटील आणि गौरव पाटीलच्या बिनसलेल्या प्रेमप्रकरणामुळेच हा पेपरफुटीचा प्रकार उघड झाला. ऋतुजाचे वडील अमृत पाटील यांनी पेपर फोडण्यासाठी प्रवीण पाटील या दलालाची मदत घेतली होती. ऋतुजाच्या हातात तो पेपर आल्यावर तिने प्रेमापोटी तो पेपर गौरव पाटील यालाही दिला. मात्र त्यांचे ब्रेकअप झाल्यावर गौरव पाटील यानेच तक्रार दाखल केली आणि हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत सहा जणांना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये एमपीएससीचे अवर सचिव अभिजीत लेंडवे यांचाही समावेश आहे. तसेच सहायक कक्ष अधिकारी गोपाळ मराठे आणि विश्वेश्वर नकाते यांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात परीक्षार्थी ऋतुजा पाटीलचे वडील अमृत पाटील यांनाही अटक करण्यात आली आहे. तर आता ऋतुजा हिलाबी पोलिसांनी ताब्यात घेतले.

# व्होट चोरीचा पॅटर्न चेंज!

## एसआयआरवरुन राहुल गांधींनी भाजपाला घेरले!

**नवी दिल्ली ।** भाजपा आणि आयोगाच्या व्होट चोरी करण्याच्या फक्त पद्धती बदलत आहेत. त्यांचा उद्देश स्पष्ट आहे कुठल्याही स्थितीत भाजपाचा विजय आणि भारताच्या लोकशाहीचा अंत. महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणूक झाली. त्यात ३९ लाख मतदार अचानक जोडले गेले. मी तेव्हाही म्हटले होते की ही व्होट चोरी होती आजही मी माझ्या म्हणण्यावर ठाम आहे. असे राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये सांगत भाजपावर प्रखर टीका केली आहे.महाराष्ट्रातील दोन कोटी मतदारांना वगळल्यानंतर त्यांनी ही टीका केली आहे.




एसआयआरचा मुद्दा पुढे आणत राहुल गांधी यांनी भाजपावर जोरदार टीका केली आहे. भाजपाने फक्त व्होट चोरी केली आहे बाकी काहीही केलेले नाही असे राहुल गांधी यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. एसआयआरच्या पहिल्या यादीतून महाराष्ट्रातल्या दोन कोटी सात लाख मतदारांची नावं वगळली आहेत. यादीत नाव नसलेल्यांना ३० सप्टेंबरपर्यंत तक्रार करता येणार आहे. हाच मुद्दा उपस्थित करत राहुल गांधींनी एक सविस्तर पोस्ट लिहिली आहे आणि भाजपावर टीका केली आहे.

## सुट्या तेलाला वर्षभर मुदतवाढ

### मुंढेंच्या निर्णयाला फडणवीसांची स्थगिती

**मुंबई ।** अन्न व औषध प्रशासनाचा कारभार हाती घेतल्यानंतर तुकाराम मुंढे त्यांच्या अनेक धडाडीच्या निर्णयाने चर्चेत आले आहेत. काही दिवसांपूर्वीच मुंढे यांनी सुटे तेल विक्रीवर बंदी आणली होती. मात्र आता हे निर्बंध १ वर्षाकरिता पुढे ढकलले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतला आहे. फडणवीसांच्या या निर्णयाने तेल व्यापाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. सरकारने २०११ च्या खाद्य सुरक्षा कायद्यातंर्गत सुटे तेल विक्री करण्यावरील बंदी १ वर्षासाठी स्थगित केली आहे.



व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर सरकारने हा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तेलाची गुणवत्ता आणि सुरक्षा अत्यंत गरजेची आहे. परंतु अनेक गरीब कुटुंबे असेही आहेत जे बाजारात सुटे तेल खरेदी करतात.

## ओबीसी बैठकीतून तीन मंत्र्यांचा सभात्याग

**मुंबई ।** मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाने राज्यात पुन्हा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे असताना मंगळवारी इतर मागासवर्गाच्या संदर्भात गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ओबीसी नेत्यांमधील मतभेद समोर आले. ओबीसी समाजाच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी मिळत नसल्याची तक्रार करत मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील आणि संजय राठोड यांनी आजच्या बैठकीतून सभात्याग केला.ज्येष्ठ मंत्र्यांच्या बहिष्काराच्या भूमिकेने महायुतीतील बेबनाव उघड झाले आहेत. दरम्यान यानंतर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले.

## मंत्रिमंडळ बैठक सोडून शिंदे दिल्लीत

**मुंबई ।** राज्य मंत्रिमंडळ बैठक आणि मंत्रालयातील पूर्वनियोजित बैठका सोडून सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी दिल्लीत दाखल झाले. सर्वोच्च न्यायालयात आज, बुधवारी शिवसेना फुटीच्या संदर्भात सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमी शिंदे दिल्लीत आले असून ते केंद्रीय गृह मंत्री आणि भाजपचे नेते अमित शहा यांची भेट घेणार असल्याचे समजते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कार्यलयाकडून आजच्या त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाची माहिती देण्यात आली होती. त्यानुसार शिंदे हे आज मंत्रिमंडळ बैठकीत सहभागी होणार होते. मात्र, या बैठकांकडे पाठ करून शिंदे आज तातडीने दिल्लीला रवाना झाले.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2250 |
| नवती (२) | : 1550 |

### मिश्कीली













